**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राष्ट्रीय जल पुरस्कारांमधे सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्राचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव.**
2. **केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते नागपुरात २१ नोव्हेंबरला होणार एग्रोव्हिजनचं उद्घाटन.**
3. **आयकॉनिक शहर विकासाच्या धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी.**

**आणि**

4. **राज्यात बिबट्यांकडून वाढत चाललेल्या मानव हल्ल्यांची समस्या 'राज्य आपत्ती' म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश.**

**आता सविस्तर बातम्या** .......

जल पुरस्कार २०२४

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज ‘राष्ट्रीय जल पुरस्कार २०२४’ प्रदान करण्यात आले. नवी दिल्ली इथं झालेल्या सोहळ्यात महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्य विभागात प्रथम पुरस्कारनं गौरवण्यात आलं. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. या विभागात गुजरातला द्वितीय तर हरियाणाला तृतीय पुरस्कार मिळाला. उत्कृष्ट स्थानिक स्वराज्य संस्था विभागात नवी मुंबईमहानगरपालिकेन प्रथम पुरस्कार पटकावला आहे. अमृताइतक्याच मौल्यवान असलेल्या जल संसाधनाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करणाऱ्या सर्वांचं कौतुक करावं तेवढं थोडं आहे, अशी भावना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी व्यक्त केली. राज्य सरकारन राबवलेल्या अभिनव जलव्यवस्थापन धोरणांचा आणि शेतकरी, पाणी वापर संस्था तसच प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागाचा हा विजय असल्याची भावना मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

आचार्य देवव्रत

भावी पिढ्यांची, अन्नधान्य आणि जलसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी नैसर्गिक शेती आवश्यक आहे, असं प्रतिपादन  महाराष्ट्र आणि गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज केलं. पुण्यातील शिवाजीनगर येथील कृषी महाविद्यालयात नैसर्गिक शेती या विषयावर प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. देशात अडीच लाख कोटी रुपये खर्च करून युरिया आणि रासायनिक खते आयात केली जात आहेत. एकाअर्थी आपणच आपल्या पैशान आपली शेतजमीन नापीक करीत आहोत. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी आणि विद्यापीठांनी

आपल्या स्तरावर नैसर्गिक शेतीच महत्व शेतकऱ्यांना पटवून द्याव, असं आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केलं.....

***इस दिशा में यूनिवर्सिटीज़ की बहुत बड़ी जिम्मेदारी है कि हमारे देशी परंपरागत बीजों को उन्नत करना बीज हमारे परंपरागत हो लेकिन उनको कितना उन्नत बनाया जा सकता है ताकि वो ज्यादा से ज्यादा उत्पादन दे सके।उनकी गुणवत्ता वही बनी रहे, उनमें रोग से लड़ने की रेजिस्ट्रेस भी बनी रहे और उत्पादन भी ज्यादा दे ये मूल काम सबसे जरूरी है जो यूनिवर्सिटीज़ का है***

स्थानिक स्वराज्य संस्था/बावनकुळे

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार अर्ज मागे घेतील, अशी अपेक्षा, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली. ते आज नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. एका जागेवर फक्त एकाच व्यक्तीला एबी फॉर्म देता येत असल्यामुळे, उर्वरित कार्यकर्त्यांनी निराश न होता पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या प्रचारासाठी काम करावं, असं आवाहन त्यांनी केलं. मुंबई महानगरपालिका निवडणुका महायुती एकत्र लढवणार असून, सरकार स्थापनेसाठी आवश्यक दोन तृतीयांश जागा आणि ५१ टक्के मतं मिळवणं हे ध्येय असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं. दरम्यान नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी दाखल अर्जांची छाननी आज होत आहे.

ॲग्रोव्हिजन

विदर्भातील शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाची आणि जोडधंद्यांची माहिती व्हावी, त्याचा उपयोग त्यांच्या उत्पन्न वाढीसाठी व्हावा आणि त्यांची शेती लाभदायक व्हावी या हेतून, केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शन येत्या 21 नोव्हेंबर पासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अमरावती रोड वरील मैदानावर सुरु होत आहे. 21 नोव्हेंबर रोजी सकाळी 10.30 वाजता केंद्रीय कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते कार्यक्रमाचं उदघाटन होणार आहे. दिनांक 21 ते 24 नोव्हेंबर दरम्यान दररोज सकाळी 11 ते 6 वाजेपर्यंत ऍग्रो व्हिजन कृषीप्रदर्शन खुले राहणार असून शेतकऱ्यांसाठी कार्यशाळांची वेळ दुपारी 12 ते 5 इतकी आहे. राष्ट्रीय कृषी प्रदर्शन, शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा, एकदिवसीय परिषदा असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

देवेंद्र फडणवीस

उद्योजक स्वतःच्या कष्टातून उद्योग उभारतात, तंत्रज्ञानाची जोड, विकासाला चालना, आधुनिक साधने यांची उपलब्धता करून दिल्यास हे उद्योजक चमत्कार घडवू शकतात. महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक लघु आणि मध्यम उद्योग असून हे क्षेत्र राज्याच्या प्रगतीचे आधारस्तंभ

असल्याचं  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन आणि युनिडो अर्थात युनायटेड नेशन्स इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन यांच्यात डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन आणि इनोव्हेशन क्षेत्रातील सहकार्यासाठी हेतुपत्र म्हणजे लेटर ऑफ इंडेटचं आज  वाटप करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

आयकर टॅक्स प्लेयर हब

टायर टू आणि टायर थ्री शहरांमध्ये कर क्षेत्र आणि करदाते वाढवण्यासाठी जास्त प्रयत्न होणे आवश्यक आहे. यासाठी 'टॅक्सपेअर्स हब नागपूर' या उपक्रमाच्या माध्यमातून छोट्या उद्योजकांना आयकर कायदा तरतुदी, करदायित्व त्याचप्रमाणे वजावट यांची माहिती मिळावी याकरिता जनजागृती मोहीम राबविण्यात येत असल्याचं प्रतिपादन नागपूरच्या मुख्य आयकर आयुक्त मालती श्रीधरन यांनी आज केलं. नागपूरच्या आयकर विभागातर्फे  'टॅक्स पेयर्स हब- नागपूर' या शिबिराचं आयोजन आज दिनांक 18 ते 20 नोव्हेंबर दरम्यान करण्यात आलं आहे. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या....

***टैक्सपेयर्स का ग्रोथ बडे बड़े शहरों में कुछ हद तक हो चुका है सेचुरेशन प्वाइंट भी हो चुकी है, लेकिन जो छोटे शहर हैं, टाइर टू टायर थ्री सिटीज है वहाँ पे पिछले दस ,बारा, पंधरा सालों में काफी डेवलपमेंट हुआ है तो वहाँ पे हमारा टैक्स बेस या टैक्स पेयर्स का  ग्रोथ होना अभि काफी बाकी है, तो हमें इनकम टैक्स डिपार्टमेंट को और सरकार को लगता है कि वहाँ पर हम अपना टैक्स बेस जो है, अच्छा ग्रो कर सकते हैं। टैक्सपेयर्स भी हम अपना वहाँ पे बढ़ा सकते हैं।***

यावेळी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या अतिरिक्त महासंचालिका रितू शर्मा उपस्थित होत्या. चिटणवीस सेंटर, सिव्हिल लाईन्स इथं आयोजित या तीन दिवसीय उपक्रमात कर प्रणाली संदर्भात विविध विषयांवर तज्ञांचं मार्गदर्शन लाभणार आहे. तसच सेल्फी बूथ,माहितीपत्रक, चित्रदालन, प्रश्नमंजुषा या माध्यमातून देखील जनजागृती करण्यात येत आहे.

मंत्रिमंडळ निर्णय

राज्यात संकल्पना आधारित एकात्मिक वसाहती किंवा व्यावसायिक क्षेत्राची निर्मिती करण्याच्या दृष्टीनं आयकॉनिक शहर विकासाचं धोरण राज्य सरकारनं जाहीर केलं आहे. मुंबईत आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या धोरणाला मान्यता मिळाली. सिडकोसह, विविध प्राधिकरणांच्या जमिनी,आणि भूखंडाचा सुयोग्य वापर निश्चित करण्याला या धोरणात प्राधान्य राहील. आज झालेल्या अन्य निर्णयांमध्ये भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्स्थापनेची प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी नवीन पदांची निर्मिती करण्याला आज मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरिता शिक्षकांची २३२ आणि शिक्षकेतर १०७ पदं अशी ३३९ पदांची निर्मिती करण्याचा प्रस्ताव बैठकीत मंजूर झाला.

बिबट्यांवर नियंत्रण

राज्यात बिबट्यांकडून वाढत चाललेल्या मानव हल्ल्यांची समस्या 'राज्य आपत्ती' म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत मांडावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. बिबट्यांना वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या शेड्यूल-1 मधून वगळून शेड्यूल-2 मध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्तावही सादर करण्याचा आदेश त्यांनी दिला आहे. मानवांवर हल्ले करणाऱ्या बिबट्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक ठिकाणी तातडीन पिंजरे बसवावेत. सोबतच पुणे जिल्हयात बिबट्यांच्या उपचार आणि पुनर्वसनासाठी दोन रेस्क्यू सेंटर, पुढील दोन ते तीन महिन्यांत सुरू करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागांना दिले. राज्यातील बिबट्यांच्या प्रश्नांसंदर्भात आज मंत्रालयात फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

धानोरा विकास

एसबीआय फाऊंडेशन आणि पुणेस्थित जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था वॉटर यांनी भागीदारी करत धानोरा तालुक्यासाठी उपजीविका विकास कार्यक्रम हाती घेतला आहे. ऐकुया याबाबत अधिक माहिती -

***एसबीआय फाऊंडेशनच्या प्रमुख 'लीप' अर्थात-Livelihood and Entrepreneurship Accelerator Programme- उपक्रमांतर्गत हा प्रकल्प वॉटर संस्थेमार्फत ऑगस्ट २०२५ ते जुलै २०२८ या तीन वर्षांसाठी धानोरा उपविभागातील 19 गावात राबविण्यात येणार आहे. फाऊंडेशनन या उपक्रमासाठी चार कोटी अठ्ठ्याण्णव लाख पासष्ट हजार रुपये अनुदान दिल आहे. धानोरा तालुक्यातील १९ ग्रामीण गावांमधील १,२९४ कुटुंबांची उपजीविका सुधारणे हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. उत्पन्नाचे स्रोत केवळ शेतीपुरते मर्यादित न ठेवता त्यांचे विविधीकरण करून, या कुटुंबांचे वार्षिक घरगुती उत्पन्न ५० टक्क्यांनी वाढवणे हे प्रकल्पाचे लक्ष्य आहे. हे उद्दिष्ट साधण्यासाठी प्रकल्प- जलसंपदा विकास, टिकाऊ शेती आणि पशुधन व्यवस्थापन या तीन मुख्य स्तंभांवर लक्ष केंद्रित करेल. यामुळे या भागातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळणार आहे. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी वीणा डोंगरवार)***

लाडकी बहीण

अलिकडे काही जिल्हयांमध्ये उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्ती, महिलांनी उपस्थित केलेल्या समस्या लक्षात घेता,मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेतील ई-केवायसी करण्याची मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. पूर्वीच्या निर्देशानुसार केवायसी करण्याची मुदत आज संपणार होती. ती आता वाढवून ३१डिसेंबर करण्यात आली आहे.

हवामान

गोंदिया इथं आज देखील सर्वात कमी म्हणजे ९ पुर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली.   विदर्भात सर्व 11 जिल्ह्यांमध्ये किमान तापमानात घट होत असून किमान तापमान 10 ते 13 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. दरम्यान, कमाल तापमानात देखील घट होत असून सर्वाधिक कमाल तापमान चंद्रपूर इथं 29 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.

*****